॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २८ (प्रतिनिधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आणि पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी) यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराअंतर्गत अनुसूचित जातीच्या ७५ विद्यार्थ्यांसाठी बँकींग (IBPS) परीक्षांच्या मार्गदर्शन वर्गासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे.

बँकींग परीक्षेच्या मार्गदर्शनासाठी बार्टीकडून निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. यासाठी विद्यापीठ आणि बार्टी पुणे यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. अनुसूचित जातीच्या ७५ विद्यार्थ्यांसाठी बँकींग (IBPS) परीक्षांच्या मार्गदर्शन वर्गासाठी दि. ४ नोव्हेंबर २०२३ पर्यंत ऑनलाईन अर्ज स्वीकारले जातील. या अर्जांची लिंक http://bati.live/barti/ibps/login आहे. सदर अर्ज हे. सविस्तर माहितीसाठी विद्यार्थ्यांनी 0257-2257411 किंवा 9420675602, 9561108747, 9561602749 या क्रमांकावर संपर्क साधावा. अशी माहिती संचालक डॉ. अजय सुरवाडे यांनी दिली.

**बातमी नं. २**

जळगाव दि. २८ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्था व क्विक हिल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात 'सायबर सुरक्षा' या विषयावर शनिवार दि. २८ ऑक्टोबर रोजी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात क्विक हिल फाऊंडेशनचे निकिता लोहार व दर्शन नेवे यांनी उपस्थितांना ई-मेलद्वारा होणारा छळ, सायबर स्टॉर्किंग, सायबर विश्वातून होणारा पाठलाग, सायबर विश्वासतून पसरविली जात असलेली अश्लिलता, सायबर बदनामी, संगणकाच्या माध्यमातून इंटरनेटवरील मजकूरामध्ये किंवा छायाचित्रांमध्ये फेरफार करणे ई-मेल द्वारे होणारे विडंबन/टवाळी या विषयी सविस्तर मार्गदर्शन करून त्याविषयीच्या उपाययोजना व तक्रारींचे निवारण या बद्दल विवेचन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक प्रा.जे.बी. नाईक हे होते. या कार्यक्रमासाठी जवळपास २०० विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. विश्वराज तायडे यांनी संस्थेच्या वतीन क्वीक हिल फाऊंडेशन व उपस्थितांचे आभार मानले.

.............................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २८ ऑक्टोबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी